

खासदार बारणे यांच्याकडून पंतप्रधानांचे आभार!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 20/08/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 186 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com




# राज्यात पावसाचे थैमान !

## राज्यात पावसाचे आठ बळी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : राज्याच्या सर्व विभागांत गेल्या ३ दिवसांपासून जोरदार पाऊस कोसळत असून पावसामुळे किमान आठ जणांचा बळी गेला आहे. आतापर्यंत बचाव पथकांनी ३०० पेक्षा जास्त नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविले आहे. प्राथमिक अंदाजानुसार राज्यभरात साडेचार लाख हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात ढगफुटीसदृश पावसामुळे सहा ते सात गावांत पूरस्थिती आहे. नांदेड जिल्ह्यात पुरामुळे किमान पाच जणांचा मृत्यू झाला असून सहा जण बेपत्ता आहेत. जिल्ह्यात सुमारे १५० जनावरे दगावल्याची प्राथमिक माहिती आहे. पुरात अडकलेल्या २९३ नागरिकांची सुटका करण्यात बचाव पथकांना यश आले. बीडमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून पुरात अडकलेल्या तीन व्यक्तींना वाचवण्यात यश आले आहे. अकोल्यामध्ये भिंत पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला. मुंबईतील मलबार हिल परिसरात भिंत पडून एकाचा मृत्यू झाला. कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी, शास्त्री, कोदवली नद्यांनी तसेच रायगड जिल्ह्यामधील कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे.

# आरोग्य कार्यक्रमांच्या रँकिंगमध्ये पिंपरी महापालिका प्रथम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने पुन्हा एकदा राज्यभरात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या एप्रिल व मे २०२५ च्या आरोग्य कार्यक्रमांच्या रँकिंगमध्ये पिंपरी चिंचवड महापालिका राज्यात प्रथम क्रमांकावर राहिली आहे.




एप्रिल महिन्यात ४५.१८ गुणांसह पिंपरी चिंचवड महापालिकेने पहिला क्रमांक पटकाविला तर मे महिन्यात सर्व बाबींवर अधिक प्रगती करत ४७.७० गुण मिळवून पुन्हा आपले प्रथम स्थान अबाधित ठेवले. या रँकिंगमध्ये मातृत्व आरोग्य, बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब नियोजन, किशोरवयीन आरोग्य, पीसीपीएनडीटी, आरसी एच पोर्टल, आयडीएसपी, क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, रेबीज नियंत्रण कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, डेंग्यू व मलेरिया नियंत्रण, असंसर्गजन्य आजार नियंत्रण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मानांकन, ई-औषधी, मोफत निदान सेवा, आयुष्मान भारत-आरोग्य व आरोग्य कल्याण केंद्रे, एचआयव्हीएस, आशा कार्यक्रम तसेच प्रशासन व वित्तीय व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या निर्देशकांचा समावेश होता. या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पिंपरी चिंचवड महापालिकेने राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या यशामुळे पुन्हा एकदा हे अधोरेखित झाले आहे की, सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळेच आरोग्यसेवेत उत्तम कामगिरी साधता येते.

> " पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने सलग दोन महिने राज्यातील पहिल्या क्रमांकावर राहून आरोग्य क्षेत्रातील कामगिरी सिद्ध केली आहे.
>
> ही यशस्वीता आपल्या वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर आणि सर्व नागरिकांच्या सहकार्यामुळे शक्य झाली आहे.
>
> आम्ही हीच गती कायम ठेवत पुढील काळातही जनतेस उत्तमोत्तम आरोग्य सुविधा देत राहू. "
>
> **शेखर सिंह,**
> आयुक्त तथा प्रशासक,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहा

## नदीकाठ परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आयुक्तांचे आवाहन

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. हवामान विभागाकडून पुणे जिल्ह्यासाठी आज रेड अलर्ट देण्यात आला असून पुणे जिल्हा व घाट परिसरात पुढील तीन तासात ४० ते ६० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शिवाय पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या नद्यांवरील धरणामधून करण्यात येणाऱ्या विसर्गामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर नदीकाठ परिसरातील नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे. पावसामुळे उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहण्याचे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी प्रशासकीय यंत्रणांना दिले आहेत.गेल्या काही



दिवसांपासून शहर परिसरात पावसाची संततधार सुरू आहे. शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत असून यामध्ये धरणातून विसर्ग देखील केला जात आहे. विशेषतः पवना धरण जवळपास ९७ टक्के भरले आहे. या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडत असून धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग केला जात आहे. आज सकाळी ९ वाजता सुमारे ५ हजार ६६० क्युसेक इतका विसर्ग या धरणातून पवना नदीपात्रात करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणाऱ्या विसर्गाचे प्रमाण अवलंबुन असल्याचे पवना धरण पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने सांगण्यात आले आहे. यासर्व बाबी विचारात घेता महापालिकेच्या सर्व यंत्रणांनी दक्ष राहण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करावे लागल्यास त्याठिकाणी भोजन, वैद्यकीयसह सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी, क्षेत्रीय कार्यालयांमार्फत जलद प्रतिसाद पथकाने दिवसरात्र नदीकाठ परिसरावर लक्ष ठेवावे, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांशी समन्वय साधून त्याभागातील आपत्कालीन परिस्थिती हाताळावी, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक साधनसामुग्रीसह आपत्कालीन पथकाने सज्ज राहावे, सखल भागात नदीच्या पाणी पातळीची माहिती देण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे त्याभागात वारंवार सूचना देण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले. पावसामुळे साथीच्या आजारांचा प्रसार होऊ नये यासाठी धुरीकरण, औषध फवारणी, तसेच नागरिकांची आरोग्य तपासणी यावर भर देण्यात यावा, वाहतूक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून कार्यवाही करावी, अशा सूचना देखील आयुक्त सिंह यांनी दिल्या.महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकारी परिस्थितीचा नियमित आढावा घेत असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. नागरिकांनी कोणतीही आपत्कालीन मदत हवी असल्यास महापालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्ष क्रमांक ०२०-६७३३११११ / ०२०-२८३३११११ किंवा अग्निशमन विभागाच्या ७०३०९०८९९१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे महापालिका प्रशासनाने सांगितले आहे.ज्याभागात नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊन पूर परिस्थिती निर्माण होते, अशा परिसरात विशेष लक्ष ठेवण्यासाठी महापालिकेच्या वतीने जलद प्रतिसाद पथके तैनात केली आहेत. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली नेमलेल्या या पथकामध्ये स्थापत्य, आरोग्य, पाणी पुरवठा, पर्यावरण, अग्निशमन, सुरक्षा, शिक्षण, वैद्यकीय अशा विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

# नॉव्हेल इंटरनॅशनल विद्यालयाचा राष्ट्रप्रेमाने उजळलेला सोहळा

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चिंचवड येथील नॉव्हेल इंटरनॅशनल विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. इतिहास, संस्कृती आणि शिक्षण यांचा संगम साधत, या विद्यालयाने राष्ट्रप्रेमाचा एक अनोखा आदर्श उपस्थितांसमोर ठेवला.कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी देशभक्तीच्या भावना जागृत केल्या. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेली भक्तिगीते, देशभक्तिपर नाटिका व नृत्य यांनी कार्यक्रमात रंगत आणली.या प्रसंगी नॉव्हेल संस्थेचे संस्थापक




अध्यक्ष आणि आमदार अमित गोरखे, संचालक विलास जेऊरकर, विद्यालय व्यवस्थापक डॉ. प्रिया गोरखे, तांत्रिक विभाग प्रमुख समीर जेऊरकर आणि मुख्याध्यापिका सौ. मृदुला गायकवाड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे शाळेचे दोन माजी विद्यार्थी – अरबाज कलावंत आणि वैभव चव्हाण – यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती. शिक्षणाच्या जोरावर त्यांनी गाठलेली यशस्वी शिखरे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायक ठरली.आमदार अमित गोरखे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना उद्देशून केलेल्या भाषणात स्वातंत्र्य दिनाचे महत्व पटवून देत, नव्या पिढीकडून सामाजिक योगदानाची अपेक्षा व्यक्त केली. तसेच, स्टुडन्ट कौन्सिल सदस्यांची औपचारिक निवडही याच दिवशी पार पडली.

यावेळी पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांनी उपस्थित राहून 'अमली पदार्थांपासून मुक्त समाज' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांच्या मनोवेधक भाषणाने उपस्थितांमध्ये सामाजिक भान निर्माण केले.

या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नॉव्हेल इंटरनॅशनल विद्यालयाचा हा उपक्रम केवळ एक सोहळा नसून, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जाणीवेचा दीप उजळवणारा एक प्रेरणादायी अनुभव ठरला.

# गुरुवारी 'या' भागात पाणीपुरवठा राहणार बंद


दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चिखली जलशुद्धीकरण केंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या महापारेषण कंपनीच्या भोसरी आर.एस. उपकेंद्र येथे गुरुवार, दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत तातडीची वीजपुरवठा देखभाल व दुरुस्तीची कामे होणार आहेत. याकाळात वीज पुरवठा खंडित राहणार असल्याने चिखली जलशुद्धीकरण केंद्र येथून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे गुरुवारी शहरातील या केंद्राच्या अखत्यारीत असणाऱ्याबोऱ्हाडेवाडी, इंद्रायणी नगर सेक्टर ४,६,९,११ व १२, शिवरस्ता, चक्रपाणीवसाहत, धावडेवस्ती, मोशी, चऱ्होली, डुडुळगाव, चोवीसावाडी व इतर परिसरातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.या भागात शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. तरी सर्व नागरिकांनी याबाबत नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सासरच्या जाचाला कंटाळून विवाहतेची आत्महत्या!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



वाकड : पिंपरी- चिंचवडमध्ये सासरच्या जाचाला कंटाळून २६ वर्षीय विवाहित तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

ही घटना सोमवारी रात्री घडली आहे. दिव्या हर्षल सूर्यवंशी, आत्महत्या केलेल्या विवाहित तरुणीच नाव आहे.

दिव्याचा तीन वर्षांपूर्वी हर्षल सोबत मोठ्या थाटात विवाह संपन्न झाला होता. काही वर्षे होत नाहीत, की त्यांच्या खटके उडायला सुरुवात झाली. पती आणि पत्नीमध्ये वाद होत होते. अशी माहिती वाकड पोलीसांनी दिली आहे. हर्षल हा उच्च शिक्षित असून नामांकित कंपनीत आयटी इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे.हर्षल हा सतत माहेराहून पैसे आणण्यासाठी दिव्यावर दबाव टाकत होता. शारीरिक आणि मानसिक छळ करत होता. अखेर या जाचाला कंटाळून दिव्याने सोमवारी रात्री बेडरूममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली.

शवविच्छेदन अहवालात देखील दिव्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचं स्पष्ट झालं आहे.

दिव्याच्या नातेवाईकांनी दिव्यांची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला. तसा आरोप दिव्याच्या सासरच्या मंडळीवर करण्यात आला आहे.

वाकड पोलीसांनी या प्रकरणी दिव्याचा पती आरोपी हर्षल सूर्यवंशी आणि सासरे शांताराम सूर्यवंशी ला ताब्यात घेतलं आहे.

# दागिने चोरणारा चोरटा दिल्लीतून अटक!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : रेल्वे प्रवासी महिलेला मदत करण्याच्या बहाण्याने बॅगेतील सोन्याच्या बांगड्या, अंगठी असा ऐवज लांबविणाऱ्या चोरट्याला लोहमार्ग पोलिसांच्या पथकाने दिल्लीतून अटक केली.

चोरट्याने पुणे आणि मिरज रेल्वे स्थानकात प्रवाशांकडील ऐवज लांबविल्याचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. त्याच्याकडून ११० ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

रमेश उर्फ मोटा पिता फूलचंद (रा. न्यू अनाज मंडी, नजफगड, दिल्ली) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. याबाबत एका महिलेने पुणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला असता रमेश आणि त्याच्याबरोबर असलेल्या चार साथीदारांनी बॅगेतून ऐवज चोरल्याचे उघडकीस आले. आरोपी रमेश दिल्लीत राहत असल्याची माहिती तांत्रिक तपासात मिळाली. त्यानंतर लोहमार्ग पोलिसांचे पथक दिल्लीला रवाना झाले. दिल्ली पोलिसांच्या मदतीने आरोपी रमेशला पकडले.

चौकशीत त्याने मिरज रेल्वे स्थानकात प्रवासी महिलेला मदत करण्याचा बहाणा करून ५७ ग्रॅम सोन्याचे दागिने लांबविल्याचे उघडकीस आले. पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अतिरिक्त अधीक्षक रोहिदास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक इरफान शेख, सहायक निरीक्षक प्रभाकर कापुरे, उपनिरीक्षक सुनील माने, दीपक धिवार, सुरेश रासकर, हवालदार दीपक ठोंबरे, संदीप काटे, प्रशांत डोईफोडे, उदय चिले, अमित गवारी, मिथून जानकर, रितेश राठोड यांनी ही कामगिरी केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 20/08/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# खासदार बारणे यांच्याकडून पंतप्रधानांचे आभार!

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा जागतिक वारसास्थळांच्या यादीत समावेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केल्याबद्दल मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह शिवसेना खासदारांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन आभार मानले. या ऐतिहासिक किल्ल्यांमध्ये महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडू राज्यातील एका किल्ल्याचा समावेश आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक महत्त्वाबरोबरच पर्यटन, स्थानिक रोजगार आणि सांस्कृतिक ओळखीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.यावेळी केंद्रीय आयुषमंत्री प्रताप जाधव, शिवसेनेचे गटनेते डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, धैर्यशील माने, रविंद्र वायकर, नरेश म्हस्के, मिलिंद देवरा उपस्थित होते. शिवसेनेच्या खासदारांनी पगडी, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा देऊन पंतप्रधान मोदी यांचा



सन्मान केला. पत्र देऊन आभार मानले. छत्रपती शिवाजी महाराज हे भारताचे महान राजा, रणनीतिकार आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपणीचे अनुभव आणि त्यांच्या आईच्या शिक्षणामुळे त्यांना एक कुशल योद्धा आणि कार्यक्षम प्रशासक बनण्यास मदत झाली. १६७४ मध्ये त्यांनी पश्चिम भारतात मराठा साम्राज्याची पायाभरणी केली आणि "छत्रपती" ही पदवी धारण केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या १६ व्या वर्षी म्हणजेच १६४५ मध्ये स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली आणि स्वराज्य मोहीम सुरू केली. त्यांची मोहीम केवळ किल्ले जिंकणे किंवा युद्धे लढणे एवढी मर्यादित नव्हती, तर त्याचे उद्दिष्ट स्वतंत्र, न्याय्य आणि स्वावलंबी राज्य म्हणजेच हिंदवी स्वराज्य स्थापन करणे होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी एक अत्यंत कार्यक्षम आणि न्याय्य शासन व्यवस्था स्थापन केली, जी जनकल्याणावर आधारित होती. त्यांनी शत्रूंना अनेक वेळा पराभूत करणारी लष्करी रणनीती विकसित केली. छत्रपती शिवाजी महाराजांना किल्ल्यांचे महत्त्व समजले आणि त्यांना त्यांच्या रणनीतीचा अविभाज्य भाग बनवले. त्यांनी ३०० हून अधिक किल्ले बांधले आणि त्यांचे नूतनीकरण केले, जे केवळ निवासस्थानासाठीच नव्हे तर लष्करी मुख्यालय, शस्त्रागार आणि खजिना म्हणून देखील वापरले जात होते. त्यांनी प्रत्येक किल्ला प्रशासकीय आणि लष्करी केंद्र म्हणून स्थापित केला. त्यांचे योगदान केवळ किल्ल्यांच्या बांधकामापुरते मर्यादित नव्हते तर त्यांनी त्यांना एक मजबूत सुरक्षा यंत्रणा म्हणून विकसित केले. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी हे किल्ले केवळ मराठा साम्राज्याच्या गौरवशाली इतिहासाचे प्रतीक नाहीत. तर लष्करी स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. याशिवाय, तामिळनाडूतील जिंजी किल्ला देखील या यादीत समाविष्ट आहे.

या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्यातील समृद्ध मराठा वारसा अधोरेखित होईल. ज्यामुळे राज्यातील लोकांचा त्यांच्या इतिहासाबद्दल अभिमान आणि जागरूकता वाढेल. हे किल्ले इतिहासाचे विद्यार्थी आणि संशोधकांसाठी महत्त्वाचे अभ्यासस्थळ बनतील, ज्यामुळे शैक्षणिक पर्यटनालाही चालना मिळेल.

या उपक्रमामुळे या किल्ल्यांच्या संवर्धन, जीर्णोद्धार आणि देखभालीला प्रोत्साहन मिळेल, जेणेकरून या किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व दीर्घकाळ टिकून राहील. हे किल्ले जागतिक नकाशावर आल्यामुळे, जगभरातील पर्यटकांना या ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याची प्रेरणा मिळेल, ज्यामुळे महाराष्ट्र राज्य पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र बनून देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देत राहील, असे खासदार बारणे यांनी म्हटले आहे.

# गणेशोत्सवासाठी ऑनलाईन पध्दतीने परवानगी सुविधा उपलब्ध

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत शहरातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, गृहनिर्माण संस्था यांना गणपती उत्सवासाठी दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या परवानग्या ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याची सुविधा तयार करण्यात आली आहे, सदर ऑनलाईन सुविधेचं हे सलग तिसरे वर्ष आहे, या सुविधेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील तसेच मनपाच्या कार्यक्षेत्राबाहेरील मात्र पिंपरी चिंचवड पोलीस यांच्या क्षेत्रातील सर्व सार्वजनिक मंडळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात, देहू, आळंदी, देहूरोड कॅन्टोन्मेंट, शिरगाव, परंदवाडी, तळेगाव इत्यादी सर्व पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत येणारा परिसर व त्या परिसरातील सार्वजनिक मंडळे या



सुविधेचा लाभ घेऊ शकतात.सदर प्रक्रियेतर्गत मंडळातील सभासदाने स्वतःचे खाते महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.pcmcindia.gov.in उपलब्ध असलेल्या गणेश उत्सव मंडप परवानगी 2025 या लिंक वर तयार करणे करणे आवश्यक आहे, सदर खाते तयार करताना मोबाईल ओटीपी द्वारे खात्यावरील मोबाईल नंबरची नोंद घेतली जाईल, प्रथमता मंडळ हे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील आहे अथवा नाही हे नोंदवणे आवश्यक आहे जेणेकरून त्या त्या प्रकारचे आवश्यक कागदपत्रे यांची मागणी संगणक प्रणाली मार्फत केली जाऊ शकते, मनपाच्या अ, ब, क, ड, इ, फ, ग व ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नोंदणी केली जाणार आहे, संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभाग सर्वप्रथम ना हरकत दाखला देईल, व त्यानंतरच संगणक प्रणाली अंतिम दाखला मंडळांना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देणार आहे.

महानगरपालिकेकडून ना हरकत दाखला मिळाल्यानंतरच पोलीस आयुक्त कार्यालयाची प्रक्रिया सुरू होणार आहे, ज्या अर्जाना महानगरपालिका अंतिम ना हरकत दाखला देते तीच प्रकरणे ही पोलिसांकडे संगण संगणक प्रणाली द्वारे फॉरवर्ड केली जाणार आहेत, मनपाच्या ना हरकत दाखल्यानंतर पोलिसांकडून संबंधित अर्ज ऑनलाईन पद्धतीने त्या त्या पोलिस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या वाहतूक विभागाकडे वर्ग केला जाणार आहे, वाहतूक विभागाच्या ना हरकत दाखल्यानंतर पोलीस कार्यालयाकडील अंतिम परवानगी मंडळास उपलब्ध होईल, मनपाच्या कार्यक्षेत्रा बाहेरील सर्व गणेश मंडळांना अर्ज करताना प्रथमतः तेथील नगरपरिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती यांकडील ना हरकत दाखला मिळवणे आवश्यक आहे, अर्ज करताना मंडळाने अध्यक्ष, अध्यक्ष, सचिव, खजिनदार यांचे छायाचित्र, मोबाईल क्रमांक तसेच देखाव्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध सुविधांची माहिती संगणक प्रणालीमध्ये पुरविणे आवश्यक आहे,गणेश स्थापना व तसेच गणेश विसर्जन मिरवणूक यांच्या मार्गाची नोंद करणे तसेच त्यामध्ये वापरली जाणाऱ्या वाहनांची संख्या, देखावा, विद्युत रोषणाई इत्यादींची माहिती देखील नोंदविणे क्रमप्राप्त आहे, मनपाच्या भूमी व जिंदगी विभागामार्फत देण्यात येणारी ही सुविधा सर्व सार्वजनिक गणेश मंडळास विनाशुल्क पद्धतीने उपलब्ध असणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968